**ठळक बातम्या**

- वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर/ सभापती ओम बिरला यांनी केली त्रिसदस्यीय समितीची घोषणा

- बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणावरुन गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व्यत्यय

- महाराष्ट्रात १५ हजार पोलीस भरती करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- जागतिक वेगवान बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताची ग्रँडमास्टर दिव्या देशमुख उपान्त्य फेरीत दाखल

**<><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरुन हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत सादर झाला. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की, महाभियोग चालवण्याचे १४६ सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाला मिळाले आहेत….

- **- होल्ड- बाईट- ओम बिरला - -**

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली. त्यात सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश महिंद्र मोहन श्रीवास्तव आणि ज्येष्ठ विधिज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात पदावर असताना त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर रोकड आढळल्यानंतर चर्चेत आले आहेत.

**<><><><>**

लोकसभेच्या सभागृहाचं कामकाज आज सुरु झाल्यावर विरोधकांनी बिहार मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षणाच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी केली होती. प्रश्नोत्तरांच्या तासात

विरोधकांच्या घोषणा सुरु झाल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी ३ वाजेपर्यंत सभागृह तहकूब केलं.

गोंधळ सुरु असतानाच ग्रामीण विकास राज्यमंत्री चंद्रशेखर पेमसेनी यांनी ‘प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण’ अंतर्गत सुरु असलेल्या घरांच्या बांधकामाबद्दलच्या प्रश्नाला उत्तर दिलं.  केंद्र सरकारने या योजनेअंतर्गत ४ कोटी १२ लाख घरांच्या बांधकामाला मंजुरी दिली असून आतापर्यंत त्यातल्या २ कोटी ९० लाख घरांचं बांधकाम पूर्ण झाल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेतही बिहार मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला होता. न्यायप्रविष्ट मुद्द्यांवर सदनात चर्चा करता येणार नाही अशी भूमिका घेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विरोधी पक्षांच्या सदस्यांना शांत राहण्याची विनंती केली. परंतु घोषणा आणि गोंधळ सुरूच राहिल्यामुळे त्यांनी सभागृह दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं आहे.

**<><><>**

बिहारमधल्या मतदार याद्या पुनरीक्षणावर हरकती मागवल्याच्या बारा दिवसांच्या कालावधीत एकाही राजकीय पक्षाकडून हरकत किंवा दावा दाखल केला गेला नाही, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. तर मतदारांनी १३ हजार ९७० दावे आणि आक्षेप नोंदवले आहेत, असं निवडणूक आयोगानं सांगितलं.

दरम्यान, हे पुनरिक्षण रद्द करावं अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे.

**<><><>**

देशाच्या एकतेचं निदर्शक असलेल्या हर घर तिरंगा अभियानानिमित्त देशभर विविध कार्यक्रम होत आहेत. ठिकठिकाणी तिरंगा ध्वज घेऊन पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत.

**<><><>**

आज जागतिक हत्ती दिन आहे. त्यानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. तामिळनाडूत कोईम्बतूर इथं जागतिक हत्ती दिनाचा राष्ट्रीय सोहळा होत आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय तसंच तामिळनाडू राज्य सरकारचा वन विभाग यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या

हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार असून या कार्यक्रमात हत्तींचं संवर्धन, मानव हत्ती संघर्ष सोडवणे या विषयांवर चर्चासत्र होणार आहे.

<><><><>

महाराष्ट्र पोलीस दलात सुमारे १५ हजार पोलिसांची भरती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचं वितरण करायचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळांतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला आणि शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. याशिवाय, सोलापूर-पुणे-मुंबई विमानप्रवास परवडण्याजोगा व्हावा, यासाठी निधी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला.

<><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या कुलगाम भागातल्या अखल जंगलामध्ये सुरु असलेली दहशतवाद विरोधी मोहीम आज बाराव्या दिवशीही सुरु असून आतापर्यंत २ दहशतवादी ठार झाले आहेत.  सुरक्षा दलांच्या ड्रोन्सपासून बचावण्यासाठी दहशतवादी दाट झाडीत आणि गुहांमध्ये लपले आहेत.  त्यांना शोधण्याच्या प्रयत्नात सुरक्षा दलांचे २ जवान शहीद झाले असून ९ जवान जखमी झाले आहेत. गेल्या काही वर्षांमधील ही सर्वात मोठी दहशतवाद विरोधी मोहीम असून जम्मू काश्मीरचे पोलीस प्रमुख आणि लष्कराच्या उत्तर कमांडचे कमांडर मोहिमेवर चोवीस तास लक्ष ठेवून आहेत.

<><><><>

पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी दिलेल्या अण्वस्त्र धमकीचा भारतानं तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अण्वस्त्राच्या कोणत्याही धमकीला भीक घालणार नाही असं भारतानं आधीच स्पष्ट केल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. भारत आपल्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करणं यापुढेही सुरूच ठेवेल असं त्यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

रशिया आणि युक्रेन यांच्यादरम्यान संघर्षविराम व्हावा आणि शांततेसाठीच्या वाटाघाटी लवकरांत लवकर सुरु व्हाव्यात यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करु अशी ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्सकी यांना दिली. यासंदर्भात उभय नेत्यांमधे काल दूरध्वनीवरुन चर्चा झाली, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. भविष्यात युक्रेनबरोबर द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर भारताचा भर राहील असंही मोदी यांनी झेलेन्स्की यांना सांगितलं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतीन येत्या शुक्रवारी अलास्का इथं भेटणार आहेत या पार्श्वभूमीवर काल हे संभाषण झालं.

<><><><>

इस्रायलने गाझापट्टीत हल्ला करून सहा पत्रकारांना मारल्याचा संयुक्त राष्ट्राच्या मानवी हक्क कार्यालयानं निषेध केला आहे. या हत्येची निःपक्षपाती आणि स्वतंत्र चौकशी व्हावी असं संयुक्त राष्ट्राचे महासचिव अंतोनियो गुटेरस यांनी म्हटल्याचं संयुक्त राष्ट्राचे प्रवक्ते स्टिफन दुजारीक यांनी सांगितलं. मारल्या गेलेल्या पत्रकारांपैकी पाच जण अल जझिरा या माध्यमसंस्थेचे वार्ताहर होते, तर एक जण स्थानिक पत्रकार होता. माध्यम अधिकार गट आणि कतारने सुद्धा या हत्येचा निषेध केला आहे. ब्रिटन सरकार या घटनेचा गांभीर्याने विचार करत असून स्वतंत्र चौकशीची मागणी करत आहे, असं  प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्या प्रवक्त्याने सांगितलं.

<><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतीन येत्या शुक्रवारी अलास्का इथं भेट घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर दोनही देशांदरम्यान व्यापार करार होण्याची शक्यता ट्रप यांनी वर्तवली आहे. तसंच रशिया आणि युक्रेनदरम्यान युध्दबंदी संदर्भात सकारात्मकता व्यक्त केली आहे. व्हाईट हाऊस इथं पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, रशियाच्या अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या स्थिती ही तिथल्या संघर्षामुळे आहे, अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५० टक्के कर लादल्याने त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला असल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><><>

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या महिला वेगवान  बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताची ग्रँडमास्टर दिव्या देशमुख ने काल चीनच्या लेई टिंगजी ला १०-३ असं हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. दिव्याने नुकतीच जॉर्जिया इथं झालेली  फिडे विश्वचषक स्पर्धा जिंकून इतिहास घडवला होता. उपांत्य फेरीत येत्या गुरुवारी तिचा मुकाबला चीनची ग्रँडमास्टर हाउ यीफान हिच्याशी होणार आहे.

//<><><><>//